Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

अवैध पिस्तूल व जिवंत काडतुसांसह संशयित जेरबंद



(पान २ वर)

। बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ ।अंक १२५। पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

» Selected

## दिल्लीत हाय अलर्ट

**नवी दिल्ली : | प्रतिनिधी:** स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय राजधानी दिल्लीत सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून सुरक्षा व्यवस्था मजबूत केली जात आहे. गुप्तचर यंत्रणांनी दिलेल्या माहितीच्या आधारे संभाव्य दहशतवादी धोका लक्षात घेता दिल्ली पोलिस हाय अलर्टवर आहेत. याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी इंडियन मुजाहिद्दीन, अल कायदा व खलिस्तानी संघटनांशी संबंधित १९ वाँटेड दहशतवाद्यांचे पोस्टर जारी करून त्यांचा शोध सुरू केला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पोस्टर्स जारी झोलेले दहशतवादी विविध दहशतवादी संघटनांशी संबंधित आहेत. देशातील अनेक बॉम्बस्फोट व दहशतवादी घटनांत त्यांची नावे समोर आली आहेत. सुरक्षा यंत्रणांनी त्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवतानाच सर्वसामान्यांना संशयास्पद हालचालींची माहिती त्वरित पोलिसांना देण्याचे आवाहन केले आहे.

### - निवडणूक आयोगाच्या निर्णयाच्या अधिकारक्षेत्रावरच ठाकरे गटाचा आक्षेप

# पदे मिळाली तीच पक्षघटना शिंदेंनी नाकारली!

## शिवसेनेचे निवडणूक चिन्ह ;अपात्रतेसंदर्भातील ठाकरे गटाच्या याचिकांवर न्यायालयात सुनावणी

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली । शिवसेनेच्या आमदारांनी स्वतंत्र बैठका घेतल्या म्हणजे राजकीय पक्षात फूट पडली, असा त्याचा अर्थ होत नाही. २०१८ मधील शिवसेनेची पक्षघटना लोकशाहीविरोधी असल्याचे कारण देत शिंदे गटाने ती अमान्य केली.**

याच पक्षघटनेच्या आधारे पदे मिळवली, निवडणुका लढवल्या आणि मंत्रीपदेही भूषविली. मग हीच पक्षघटना केंद्रीय निवडणूक आयोगाने का फेटाळली? पक्षघटनेत 'मुख्यनेते' हे पदच नसताना एकनाथ शिंदे यांनी ते पद कसे स्वीकारले? पक्षाची घटना लोकशाहीवादी आहे की लोकशाहीविरोधी, हे ठरवणे निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेतच नाही, मग, शिंदे गट हीच मूळ शिवसेना का मानले गेले आणि विधिमंडळातील फूट ही राजकीय फूट का ठरवले गेले, असे प्रश्न विचारत ज्येष्ठ वकील कपिल सिबल यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाच्या अधिकारक्षेत्रावरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शिवसेनेचे निवडणूक चिन्ह आणि आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील



ठाकरे गटाच्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी सुरू आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत सिबल यांनी आयोगाच्या वादग्रस्त निर्णयातील चार प्रमुख मुद्द्यांवर तीव्र आक्षेप घेतला. शिवसेनेच्या राजकीय पक्षात फूट पडल्याचा निष्कर्ष आयोगाने कशाच्या आधारे काढला, पक्षघटनेच्या आधारे वाद सोडवण्याची पद्धत का अमान्य केली, बहुमताचा निकष स्वीकारताना संघटनात्मक बहुमताचा विचार का केला नाही आणि विधिमंडळातील बहुमताच्या आधारे पक्षाचे चिन्ह शिंदे गटाला का देण्यात आले, असे प्रश्न सिबल यांनी केले.

या प्रकरणाची पुढील सुनावणी बुधवारी होणार आहे. विधिमंडळ पक्षाच्या स्वतंत्र बैठका घेणे हा राजकीय पक्षात फूट पडल्याचा पुरावा होऊ शकत नाही. दोन्ही गटांनी स्वतंत्र बैठका घेतल्या, आपापले गटनेते आणि मुख्य प्रतोद नियुक्त केले तसेच एकमेकांच्या आमदारांविरुद्ध अपात्रतेची कारवाई सुरू केली. या बाबींच्या आधारे आयोगाने पक्षात फूट पडल्याचा निष्कर्ष काढला. मात्र, २१ जूनचे पत्र केवळ विधिमंडळ पक्षाशी संबंधित होते. त्याला राजकीय पक्षातील फुटीचा पुरावा मानणे ही आयोगाची

### मूळ पक्षाचा दर्जा का देण्यात आला?

शिंदे गटाला पक्षघटनेच्या आधारे मिळालेल्या राजकीय लाभांकडे दुर्लक्ष करून तिच्या लोकशाहीविरोधी स्वरूपाचा आधार घेत पक्षाचे चिन्ह देणे कायदेशीरदृष्ट्या विसंगत आहे. पक्ष ही स्वेच्छेने स्थापन झालेली संघटना असते. एखादी संघटना एकाधिकारवादी आहे, असे मानले तरी तिची घटना अमान्य करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया आवश्यक आहे. संघटनेला नोटीस बजावून त्यानंतर तिची मान्यता रद्द करता येते. मात्र, अशी कोणतीही नोटीस दिली नव्हती. पक्षघटना अमान्य करून दुसऱ्या गटाला मूळ पक्षाचा दर्जा का देण्यात आला.

चूक होती, असे सिबल यांनी म्हटले. मूळ राजकीय पक्षात प्रथम फूट हवी. समाजवादी पक्षाच्या तसेच अन्य एका प्रकरणाचा आधार घेत आयोगाने विधिमंडळातील फूट ही राजकीय पक्षातील फूट मानली. मात्र, त्या दोन्ही प्रकरणांमध्ये प्रथम राजकीय पक्षात फूट पडली होती, याकडे सिबल यांनी लक्ष वेधले. त्यामुळे आयोगाचा प्रारंभीचा निष्कर्षच बेकायदेशीर ठरल्यास त्यावर आधारित पुढील संपूर्ण निर्णयही अवैध ठरतो, असा दावा त्यांनी केला.

## पारोळ्यात संत शिरोमणी सावता महाराजांना अभिवादन
## संत सावता माळी यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेचे भक्तिभावाने पूजन

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | (प्रतिनिधी):** संत शिरोमणी सावता माळी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पारोळा शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० वाजता महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ संत सावता माळी यांच्या प्रतिमेचे भक्तिभावाने व उत्साहात पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कैलास महाजन होते. यावेळी उपाध्यक्ष संजय महाजन, नगरसेविका तथा गटनेत्या अलका धीरज महाजन, नगरसेवक भूषण टिपरे, माजी नगरसेवक तथा गटनेते बापू महाजन, नगरसेवक नितीन सोनार यांच्यासह समाजातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. प्रतिमा पूजनाच्या कार्यक्रमास पंच युवराज महाजन, संतोष शेनपडु महाजन, ज्ञानेश्वर महाजन, भगवान महाजन, वना महाजन, सुरेश



महाराज, संतोष महाजन, दिलीप महाजन, सुरेश महाजन, सोमनाथ महाजन, विक्की महाजन, गोपाल महाजन, परेश महाजन, नारायण महाजन यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी संत सावता महाराज यांच्या जीवनकार्याचे स्मरण करून त्यांच्या पावन स्मृतींना अभिवादन केले. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संत शिरोमणी सावता माळी यांच्या पुण्यतिथीनिमित्त पारोळा शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० वाजता महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ संत सावता माळी यांच्या प्रतिमेचे भक्तिभावाने व उत्साहात पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कैलास महाजन होते. यावेळी उपाध्यक्ष संजय महाजन, नगरसेविका तथा गटनेत्या अलका धीरज महाजन, नगरसेवक भूषण टिपरे, माजी नगरसेवक तथा गटनेते बापू महाजन, नगरसेवक नितीन सोनार यांच्यासह समाजातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## अन्नात भेसळ करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करा!

जन सम्राट टाईम्स

**पारोळा| प्रतिनिधी:** नागरिकांच्या आरोग्याशी आणि विशेषतः लहान मुलांच्या जीवाशी खेळणाऱ्या दूध, दुग्धजन्य पदार्थ तसेच इतर अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाला दिले आहेत. भेसळ करणाऱ्यांविरोधात संघटित गुन्हेगारीच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करून मकोका अंतर्गत कारवाई करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. 'महाराष्ट्र २०४७' अंतर्गत सन २०२६-२७ या वर्षासाठी विभागनिहाय निश्चित करण्यात आलेले टप्पे आणि त्यांच्या पूर्ततेसाठी सुरू असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सादरीकरणावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी भेसळखोरांविरोधात कठोर भूमिका घेण्याचे निर्देश दिले.

## अदानी यांना अमेरिकन न्यायालयाचा दिलासा

**नवी दिल्ली :** अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी आणि त्यांचे पुतणे सागर अदानी यांच्या विरोधात अमेरिकेत दाखल असलेले सर्व गुन्हेगारी खटले तेथील न्यायालयाने कायमचे रद्द केले आहेत.

अमेरिकेच्या ईस्टर्न डिस्ट्रिक्ट ऑफ न्यू यॉर्कच्या न्यायमूर्ती निकोलस गराऊफिस यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला असून यामुळे जवळपास दोन वर्षांपासून सुरू असलेल्या लाचखोरी आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या प्रकरणाला पूर्णविराम मिळाला आहे. अमेरिकेच्या न्याय विभागाने 'रूल ४८(अ)' अंतर्गत गौतम अदानी, सागर अदानी आणि अदानी ग्रीनचे माजी सीईओ विनित जैन यांच्यावरील आरोपपत्र मागे घेण्याची याचिका दाखल केली होती.

## माहिती अधिकारीपदी संजीवनी जाधव-पाटील रुजू
## संभाजीनगर जिल्हा माहिती कार्यालयात पदभार स्वीकारला

जन सम्राट टाईम्स

**संभाजीनगर| प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे माहिती अधिकारी म्हणून श्रीमती संजीवनी जाधव-पाटील नुकत्याच रुजू झाल्या. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने तसेच कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. मूळच्या छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असलेल्या श्रीमती जाधव-पाटील यांनी यापूर्वी उप माहिती कार्यालय, शिर्डी येथे उपसंपादक म्हणून काम केले आहे. त्यानंतर त्यांनी विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तसेच विभागीय



माहिती कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई येथे सहायक संचालक म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. पत्रकारिता क्षेत्रातही प्रदीर्घ अनुभव श्रीमती जाधव-पाटील यांनी पत्रकारिता विषयात बी.जे., एम.जे. तसेच एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे. प्रशासनात प्रवेश करण्यापूर्वी त्यांनी दैनिक लोकपत्रमध्ये उपसंपादक म्हणून काम केले. तसेच आकाशवाणी केंद्रावर प्रादेशिक वृत्तनिवेदिका आणि एमसीएन (माध्यम) वृत्तवाहिनीवर निवेदिका म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे. प्रशासकीय सेवा, पत्रकारिता आणि प्रसारमाध्यमांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या संजीवनी जाधव-पाटील यांच्या रुजू होण्यामुळे जिल्हा माहिती कार्यालयाच्या कामकाजाला त्यांच्या अनुभवाचा लाभ होणार आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे माहिती अधिकारी म्हणून श्रीमती संजीवनी जाधव-पाटील नुकत्याच रुजू झाल्या. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने तसेच कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## 10, 20 रुपयांच्या 100 कोटी पॉलिमर नोटा चलनात येणार!
## केंद्र सरकारने मंजुरी दिल्याची निर्मला सीतारामन यांची माहिती

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** १० आणि २० रुपयांच्या प्रत्येकी १०० कोटी पॉलिमर नोटांच्या 'फील्ड ट्रायल'साठी सरकारने मंजुरी दिली आहे, अशी माहिती मंगळवारी संसदेत देण्यात आली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) आपल्या केंद्रीय मंडळाच्या शिफारशीनुसार, 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, १९३४' च्या कलम २५ अन्वये सरकारकडे एक प्रस्ताव पाठवला होता.या प्रस्तावात १० आणि २० रुपयांच्या प्रत्येकी १०० कोटी पॉलिमर नोटांच्या चाचणीसाठी (फील्ड ट्रायल) आणि चाचणी यशस्वी झाल्यानंतर या दोन मूल्यांच्या पॉलिमर नोटांच्या नियमित वितरणासाठी परवानगी मागण्यात आली होती, असे



अर्थमंत्र्यांनी राज्यसभेत एका लेखी उत्तरात सांगितले. सरकारने या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. आरबीआयच्या म्हणण्यानुसार, कागदी नोटांसोबतच या पॉलिमर नोटांचेही वितरण करण्याचा प्रस्ताव आहे, असे त्या म्हणाल्या. आरबीआयने कळवले आहे की, या नोटांच्या खरेदीची प्रक्रिया सध्या प्राथमिक टप्प्यावर आहे, असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे, पॉलिमर नोटांच्या वितरणाची नेमकी वेळ किंवा त्यावर होणारा संभाव्य खर्च निश्चित करणे सध्याच्या टप्प्यावर शक्य नाही, असे त्या म्हणाल्या. १० आणि २० रुपयांच्या प्रत्येकी १०० कोटी पॉलिमर नोटांच्या 'फील्ड ट्रायल'साठी सरकारने मंजुरी दिली आहे, अशी माहिती मंगळवारी संसदेत देण्यात आली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) आपल्या केंद्रीय मंडळाच्या शिफारशीनुसार, 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, १९३४' च्या कलम २५ अन्वये सरकारकडे एक प्रस्ताव पाठवला होता.या प्रस्तावात १० आणि २० रुपयांच्या प्रत्येकी १०० कोटी पॉलिमर नोटांच्या चाचणीसाठी (फील्ड ट्रायल) आणि चाचणी यशस्वी झाल्यानंतर या दोन मूल्यांच्या पॉलिमर नोटांच्या नियमित वितरणासाठी परवानगी मागण्यात आली होती, असे अर्थमंत्र्यांनी राज्यसभेत एका लेखी उत्तरात सांगितले. सरकारने या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. आरबीआयच्या म्हणण्यानुसार, कागदी नोटांसोबतच या पॉलिमर नोटांचेही वितरण करण्याचा प्रस्ताव आहे, असे त्या म्हणाल्या. आरबीआयने कळवले आहे की, या नोटांच्या खरेदीची प्रक्रिया सध्या प्राथमिक टप्प्यावर आहे, असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे, पॉलिमर नोटांच्या वितरणाची नेमकी वेळ किंवा त्यावर होणारा संभाव्य खर्च निश्चित करणे सध्याच्या टप्प्यावर शक्य नाही.




# प्रल्हाद सोनवणे यांची भाजपा आदिवासी मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी नियुक्ती!

## जळगाव जिल्ह्याला प्रदेशस्तरावर प्रतिनिधित्व; विविध मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टी आदिवासी मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची घोषणा प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार डॉ. देवराव होळी आणि आदिवासी मोर्चाचे प्रभारी आमदार योगेश सागर यांनी केली असून, त्यामध्ये जळगाव येथील ज्येष्ठ भाजपा नेते प्रल्हाद सोनवणे यांची महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. देवराव होळी यांच्या नेतृत्वात राज्यभरातील संघटन कौशल्य असलेल्या, तसेच आदिवासी समाजासाठी कार्यरत असलेल्या अनुभवी व युवा कार्यकर्त्यांना प्रदेश कार्यकारिणीत संधी देण्यात आली आहे. संघटनात्मक कार्याची दखल प्रल्हाद सोनवणे हे भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष असून, नेताजी सुभाषचंद्र बोस रिक्षा युनियन, जळगाव जिल्हा या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. आदिवासी समाजातील विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणे, शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविणे आणि संघटनात्मक बांधणी मजबूत करणे या क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांना ही महत्त्वपूर्ण जबाबदारी दिली आहे. जिल्ह्याला मिळाले प्रदेशस्तरीय प्रतिनिधित्व जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, आमदार राजू



मामा भोळे, माजी आमदार रमेश पाटील, आदिवासी मोर्चाचे प्रदेश संयोजक ॲड. किशोर काळकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रल्हाद सोनवणे यांनी पक्ष संघटनेत सक्रियपणे कार्य केले आहे.

त्यांच्या नियुक्तीमुळे जळगाव जिल्ह्याला प्रदेशस्तरावर प्रतिनिधित्व मिळाल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. अनेक मान्यवरांकडून अभिनंदन प्रल्हाद सोनवणे यांच्या नियुक्तीबद्दल मंत्री गिरीश महाजन, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ, आमदार राजू भोळे, मंगेश चव्हाण, अमोल जावळे, माजी आमदार रमेश पाटील, भाजपा जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, पूर्व विभाग जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर, पश्चिम विभाग जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी, अनुसूचित जमाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष हरिलाल कोळी व सुभाष पवार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. आदिवासी समाजासाठी अधिक व्यापक कार्याचा संकल्प प्रदेश कार्यकारिणी सदस्य म्हणून प्रल्हाद सोनवणे हे आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडणे, केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे, युवक व महिलांना संघटनेशी जोडणे आणि आदिवासी मोर्चाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी कार्य करणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे भाजपा आदिवासी मोर्चाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काळात उत्तर महाराष्ट्रासह राज्यभरात संघटनात्मक उपक्रमांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. देवराव होळी यांच्या नेतृत्वात राज्यभरातील संघटन कौशल्य असलेल्या, तसेच आदिवासी समाजासाठी कार्यरत असलेल्या अनुभवी व युवा कार्यकर्त्यांना प्रदेश कार्यकारिणीत संधी देण्यात आली आहे. संघटनात्मक कार्याची दखल प्रल्हाद सोनवणे हे भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष असून, नेताजी सुभाषचंद्र बोस रिक्षा युनियन, जळगाव जिल्हा या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे.

# अवैध पिस्तूल व जिवंत काडतुसांसह संशयित जेरबंद



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** शनीपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी धडक कारवाई करत बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या एका संशयितास ताब्यात घेतले. त्याच्याकडून देशी बनावटीचे एक पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. गस्तीदरम्यान संशयित पोलिसांच्या ताब्यात शनीपेठ पोलीस ठाण्याचे पथक परिसरात गस्त घालत असताना स्मशानभूमीजवळील उमेश बियर शॉपी परिसरात एक संशयित इसम आढळून आला. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे आढळून आली. पोलिसांनी तात्काळ शस्त्र व काडतुसे ताब्यात घेत संशयितास अटक केली. आर्म्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल या प्रकरणी शनीपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. १७२/२०२६ नुसार आर्म्स ॲक्ट कलम २५(१-बी)(अ) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या शस्त्राचा वापर कोणत्या कारणासाठी करण्यात येणार होता,

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

# पाचोऱ्यात केंद्रस्तरीय ‘स्पेलिंग बी’ सराव स्पर्धा

## शाळांमध्ये इंग्रजी विषयावर विशेष भर



जन सम्राट टाईम्स


**पाचोरा । प्रतिनिधी:** ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयातील वाचन, आकलन आणि शब्दलेखन कौशल्य विकसित करण्यासाठी पाचोरा पंचायत समितीच्या शिक्षण विभागामार्फत केंद्रस्तरीय ‘स्पेलिंग बी’ सराव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. गटविकास अधिकारी के. बी. अंजने आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश पाटील यांच्या प्रेरणेने हा उपक्रम राबविण्यात आला. गटशिक्षणाधिकारी विजय पवार, शालेय पोषण आहार अधीक्षक सरोज गायकवाड आणि गटसमन्वयक जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी शाळास्तरावर स्पेलिंग बी सराव स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत सुमारे १४५ शाळांनी सहभाग नोंदविला. १४ केंद्रांवर ५६० विद्यार्थ्यांचा सहभाग शाळास्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी केंद्रस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पाचोरा तालुक्यातील १४ केंद्रांवर झालेल्या या उपक्रमात सुमारे ५६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धा एकूण चार गटांमध्ये घेण्यात आली. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयातील वाचन, आकलन आणि शब्दलेखन कौशल्य विकसित करण्यासाठी पाचोरा पंचायत समितीच्या शिक्षण विभागामार्फत केंद्रस्तरीय ‘स्पेलिंग बी’ सराव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. गटविकास अधिकारी के. बी. अंजने आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश पाटील यांच्या प्रेरणेने हा उपक्रम राबविण्यात आला. गटशिक्षणाधिकारी विजय पवार, शालेय पोषण आहार अधीक्षक सरोज गायकवाड आणि गटसमन्वयक जितेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी शाळास्तरावर स्पेलिंग बी सराव स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत सुमारे १४५ शाळांनी सहभाग नोंदविला. १४ केंद्रांवर ५६० विद्यार्थ्यांचा सहभाग शाळास्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी केंद्रस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. पाचोरा तालुक्यातील १४ केंद्रांवर झालेल्या या उपक्रमात सुमारे ५६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# धानोरा येथील शेतकऱ्याची १ लाख ९६ हजारांची सायबर फसवणूक

## सलग दोन दिवस खात्यातून प्रत्येकी ९८ हजार रुपये गायब

जन सम्राट टाईम्स

**चोपडा| प्रतिनिधी:** सायबर गुन्हेगारांनी आता शहरांबरोबरच ग्रामीण भागातील नागरिकांनाही लक्ष्य करण्यास सुरुवात केली असून, धानोरा येथील एका शेतकऱ्याच्या बँक खात्यातून अवघ्या दोन दिवसांत तब्बल १ लाख ९६ हजार रुपये परस्पर वळते केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सलग दोन दिवस खात्यातून प्रत्येकी ९८ हजार रुपयांचे संशयास्पद व्यवहार झाल्याने परिसरातील शेतकरी आणि बँक खातेदारांमध्ये खळबळ उडाली आहे. धानोरा येथील शेतकरी दीपक रोहिदास साळुंखे (वय ३५) यांच्या बँक खात्यातून अज्ञात सायबर भामट्याने ७ ऑगस्ट रोजी ९८ हजार रुपये, तर ८ ऑगस्ट रोजी पुन्हा ९८ हजार रुपये अशा दोन स्वतंत्र व्यवहारांतून एकूण १ लाख ९६ हजार रुपये परस्पर वळते केले. खात्यातील मोठी रक्कम कमी झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर साळुंखे यांनी बँक व्यवहारांची माहिती घेतली. त्यावेळी त्यांच्या



खात्यातून त्यांच्या परवानगीशिवाय मोठ्या रकमेचे व्यवहार झाल्याचे समोर आले. आपली सायबर फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर दीपक साळुंखे यांनी याबाबत जळगाव येथील सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू केला आहे. गुन्हेगारांनी नेमकी कोणती पद्धत वापरली, याचा शोध पोलीस घेत आहेत. संबंधित व्यक्तीला खात्याची माहिती कशी मिळाली, खात्यातून रक्कम कोणत्या बँक खात्यात किंवा कोणत्या माध्यमातून वळविण्यात आली, तसेच या प्रकरणात एकापेक्षा अधिक व्यक्तींचा सहभाग आहे का, याबाबत तांत्रिक तपास सुरू आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे. मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग आणि यूपीआयचा वापर ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.


त्याचबरोबर सायबर गुन्हेगारांकडून विविध आमिषे, बनावट फोन कॉल, लिंक, संदेश तसेच बँक अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्याचे प्रकार वाढत आहेत. शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, छोटे व्यावसायिक आणि सर्वसामान्य बँक खातेदारांनी आर्थिक व्यवहार करताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीला बँक खात्याची माहिती, एटीएम किंवा डेबिट कार्ड क्रमांक, ओटीपी, यूपीआय पिन अथवा इतर गोपनीय माहिती देऊ नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# ॲड. सूर्यवंशी यांची महाराष्ट्र माळी समाज महासंघाच्या धुळे जिल्हाध्यक्षपदी निवड!

## अभ्यासू नेतृत्वामुळे समाज संघटनेला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा

जन सम्राट टाईम्स

**धुळे| प्रतिनिधी:** महाराष्ट्र माळी समाज महासंघाच्या मुख्य कार्यकारिणीत धुळे जिल्हाध्यक्षपदी ॲड. जगदिश गंगाधर सूर्यवंशी यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल महाजन यांच्या आदेशानुसार त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. न्यायालयीन क्षेत्रात कार्यरत असलेले ॲड. जगदिश सूर्यवंशी हे उच्चशिक्षित, अभ्यासू आणि सामाजिक प्रश्नांची जाण असलेले तरुण नेतृत्व म्हणून परिचित आहेत. संघटनात्मक कार्याची क्षमता, समाजातील विविध प्रश्नांचा अभ्यास आणि युवकांना सोबत घेऊन काम करण्याची भूमिका लक्षात घेऊन त्यांच्यावर धुळे जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तीन पिढ्यांचा सामाजिक वारसा ॲड. जगदिश सूर्यवंशी यांना सामाजिक व सार्वजनिक कार्याचा समृद्ध वारसा लाभला आहे. त्यांचे आजोबा कै. दादासाहेब लोटन गोबजी माळी, माजी नगराध्यक्ष, यांनी सामाजिक व सार्वजनिक



जीवनात उल्लेखनीय योगदान दिले. त्यांचे वडील नानासो. गंगाधर लोटन माळी, संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, धुळे यांनीही सामाजिक क्षेत्रात सक्रिय योगदान दिले आहे. त्यांचे मोठे बंधू ललितदादा माळी हे विद्यमान नगरसेवक असून, सामाजिक व सार्वजनिक जीवनात कार्यरत आहेत. त्यामुळे तीन पिढ्यांच्या सामाजिक कार्याचा अनुभव आणि व्यापक जनसंपर्काचा वारसा ॲड. जगदिश सूर्यवंशी यांना लाभला आहे. युवकांना संघटनेशी जोडण्यावर भर धुळे जिल्ह्यातील माळी समाजाचे संघटन अधिक मजबूत करणे, समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे, युवकांचा संघटनात्मक कार्यातील सहभाग वाढविणे आणि समाजाच्या विकासाशी संबंधित प्रश्नांना प्रभावीपणे मांडणे, यावर आगामी काळात भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. “समाज संघटन हाच विकासाचा पाया” या भूमिकेतून ॲड. जगदिश सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली धुळे जिल्ह्यात महासंघाच्या कार्याला व्यापक स्वरूप मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. उच्चशिक्षित तरुण नेतृत्व, न्यायालयीन क्षेत्राचा अनुभव, तीन पिढ्यांचा सामाजिक वारसा आणि व्यापक जनसंपर्क यामुळे महाराष्ट्र माळी समाज महासंघाच्या जिल्ह्यातील संघटनात्मक वाटचालीला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

ॲड. जगदिश गंगाधर सूर्यवंशी यांच्या निवडीबद्दल समाजबांधवांकडून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या आगामी सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत. मुख्य कार्यकारिणीत धुळे जिल्हाध्यक्षपदी ॲड. जगदिश गंगाधर सूर्यवंशी यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे. महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल महाजन यांच्या आदेशानुसार त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

# ग्रामपंचायत कार्यालयातच गुटखा खाऊन थुंकल्याचा आरोप

## कळमसरा येथील प्रकाराने प्रशासनाच्या शिस्तीवर प्रश्नचिन्ह

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील कळमसरा ग्रामपंचायत कार्यालयातील एका खोलीत कर्मचाऱ्यांकडून गुटखा खाऊन थुंकला जात असल्याचा प्रकार समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे. ग्रामपंचायत कार्यालय हे नागरिकांच्या दैनंदिन कामकाजाशी संबंधित महत्त्वाचे ठिकाण असताना कार्यालयाच्या परिसरातच



अस्वच्छता निर्माण होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामपंचायत कार्यालय स्वच्छ आणि शिस्तबद्ध असणे अपेक्षित असताना कार्यालयातील खोलीत गुटखा खाऊन थुंकल्याचा प्रकार घडत असल्यास हा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न निर्माण करणारा प्रकार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. स्वच्छता अभियानाला हरताळ? एकीकडे शासन आणि स्थानिक प्रशासनाकडून स्वच्छता, तंबाखूमुक्त परिसर आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याबाबत जनजागृती केली जात आहे. दुसरीकडे ग्रामपंचायत कार्यालयातच गुटखा खाऊन थुंकण्याचा प्रकार होत असल्याचा आरोप झाल्याने या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कार्यालयात येणाऱ्या नागरिकांनाही अस्वच्छ वातावरणाचा सामना करावा लागत असल्याने संबंधित प्रकाराची तातडीने दखल घेण्याची मागणी होत आहे.

# भुसावळमध्ये ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत सायकल रॅली

## विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी :** ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत भुसावळ येथील ताप्ती पब्लिक स्कूल येथून भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत ताप्ती पब्लिक स्कूलसह शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी आपल्या सायकलींवर तिरंगा ध्वज लावून रॅलीत सहभाग घेतला. यावेळी ‘भारत माता की जय’ आणि ‘वंदे मातरम्’ अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये देशभक्ती, राष्ट्रध्वजाबद्दल आदर आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. मान्यवरांच्या उपस्थितीत रॅलीचे उद्घाटन सायकल रॅलीचे उद्घाटन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डॉ. कुलदीप ठाकरे, गटशिक्षणाधिकारी किशोर वायकोळे, ताप्ती पब्लिक स्कूलच्या प्राचार्या नीना कटलर, सायकलिंग असोसिएशनचे सचिव तथा महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे राज्य उपाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष डॉ. प्रदीप साखरे, भुसावळ वाहतूक शाखेचे पीएसआय असलम खान, सहायक फौजदार संजय भदाणे, विज्ञान मंडळाचे अध्यक्ष सुनील वानखडे आणि प्रा. मनोज वारके यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी ताप्ती पब्लिक स्कूलचे क्रीडा शिक्षक विजय संकत यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रभक्तीचा संदेश ‘हर घर तिरंगा’ अभियानाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या सायकल रॅलीत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग विशेष आकर्षण ठरला. तिरंगा ध्वजाचा सन्मान, देशभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात या उपक्रमाची महत्त्वपूर्ण भूमिका ठरली.‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत भुसावळ येथील ताप्ती पब्लिक स्कूल येथून भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत ताप्ती पब्लिक स्कूलसह शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

# भूषण महाजन यांची पत्रकार संघाच्या जळगाव जिल्हाध्यक्षपदी पुनर्नियुक्ती

## गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र प्रदान; पत्रकार संघटनेच्या कार्याचा गौरव

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या जळगाव जिल्हाध्यक्षपदी भूषण महाजन यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे यांच्या हस्ते, राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीशभाऊ महाजन यांच्या उपस्थितीत भूषण महाजन यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी जळगाव शहराच्या महापौर दीपमाला काळे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी तसेच पत्रकार बांधव



उपस्थित होते. भूषण महाजन हे गेल्या दशकभरापासून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून संघटनात्मक कार्यात सक्रिय आहेत. पत्रकारांच्या हक्कांसाठी विविध आंदोलने व उपक्रम राबविण्यासह संघटनेचा विस्तार करण्यासाठी त्यांनी योगदान दिले आहे. पत्रकारांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्याबरोबरच संघटनेचे कार्य जिल्ह्याच्या विविध भागांत पोहोचविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. प्रभावी पाठपुराव्याचा निर्धार भूषण महाजन यांच्या कार्याची दखल घेत संघटनेने पुन्हा एकदा त्यांच्यावर जळगाव जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे. आगामी काळात पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी प्रभावीपणे पाठपुरावा करून संघटनेचे कार्य अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. विविध क्षेत्रांतून अभिनंदन भूषण महाजन यांच्या पुनर्नियुक्तीचे पत्रकारिता, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातून स्वागत करण्यात आले. विविध मान्यवर, पत्रकार बांधव आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या जळगाव जिल्हाध्यक्षपदी भूषण महाजन यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे यांच्या हस्ते, राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीशभाऊ महाजन यांच्या उपस्थितीत भूषण महाजन यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी जळगाव शहराच्या महापौर दीपमाला काळे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते. भूषण महाजन हे गेल्या दशकभरापासून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून संघटनात्मक कार्यात सक्रिय आहेत.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# 15 ऑगस्टला मुख्याधिकारी नेमक्या कोणत्या ध्वजस्तंभावर तिरंगा फडकवणार?

## मूळ ध्वजस्तंभ हटविल्याने संभ्रम; ७५ फुटी ध्वजस्तंभाचा उद्देशही अनुत्तरित; प्रशासनाचे मौन कायम

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी:** स्वातंत्र्यदिन अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना भडगाव नगरपरिषदेत १५ ऑगस्ट रोजी राष्ट्रध्वज नेमक्या कोणत्या ध्वजस्तंभावर फडकविला जाणार? हा प्रश्न चर्चेत आला आहे. नगरपरिषद कार्यालय परिसरातील मूळ राष्ट्रीय ध्वजस्तंभ हटविण्यात आल्याने या निर्णयामागील आदेश, प्रशासकीय मंजुरी आणि कारणांबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. या प्रकरणी निवेदन देऊनही प्रशासनाकडून अद्याप स्पष्ट भूमिका अथवा लेखी उत्तर मिळाले नसल्याचा आरोप भावेश भगवान पाटील यांनी केला आहे. मूळ ध्वजस्तंभ कुणाच्या आदेशाने हटविला? नगरपरिषद कार्यालयातील मूळ राष्ट्रीय ध्वजस्तंभ कोणत्या आदेशाने हटविण्यात आला? तो हटविण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेण्यात आली होती का? संबंधित आदेश, ठराव अथवा प्रशासकीय कागदपत्रे कोणती, याची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आली आहे. भावेश भगवान पाटील यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे निवेदन देऊन मूळ ध्वजस्तंभ हटविण्याची सखोल चौकशी, संबंधित आदेश व कागदपत्रे सार्वजनिक करणे आणि मूळ ध्वजस्तंभ पूर्ववत उभारणे, अशी मागणी केली आहे. मात्र निवेदन देऊन १५ दिवस उलटूनही ठोस कार्यवाही किंवा लेखी उत्तर मिळाले नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ७५ फुटी ध्वजस्तंभ नेमका कुणासाठी? भडगाव येथे उभारण्यात आलेल्या ७५ फूट उंच राष्ट्रीय ध्वजस्तंभामुळेही नवा प्रश्न निर्माण झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या ३० जून २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी ७५ फूट उंच राष्ट्रीय ध्वज उभारण्याची तरतूद करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र भडगावातील हा ध्वजस्तंभ तालुका मुख्यालयासाठी आहे की नगरपरिषद कार्यालयासाठी? तो कोणत्या विभागाच्या अखत्यारित आहे? त्यासाठी निधी कोणत्या योजनेतून उपलब्ध झाला? तसेच प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी कोणत्या आधारावर देण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे अद्याप स्पष्ट झालेली नसल्याचा आरोप आहे.



१५ ऑगस्टला नेमके होणार काय? स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आता सर्वांचे लक्ष नगरपरिषद प्रशासनाच्या भूमिकेकडे लागले आहे. मुख्याधिकारी १५ ऑगस्ट रोजी नेमक्या कोणत्या ध्वजस्तंभावर राष्ट्रध्वज फडकवणार? मूळ ध्वजस्तंभ हटविल्यानंतर ७५ फुटी ध्वजस्तंभावर ध्वजारोहण होणार आहे का, की नगरपरिषद कार्यालयासाठी स्वतंत्र ध्वजस्तंभ उभारला जाणार, याबाबत अद्याप अधिकृत माहिती देण्यात आलेली नसल्याने संभ्रम कायम आहे. राष्ट्रीय ध्वजाशी संबंधित बाब असल्याने प्रशासनाने या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे. मूळ ध्वजस्तंभ हटविण्याचा आदेश, ७५ फुटी ध्वजस्तंभाची प्रशासकीय पार्श्वभूमी आणि १५ ऑगस्टच्या ध्वजारोहणाची अधिकृत व्यवस्था याबाबत पारदर्शकपणे माहिती जाहीर करावी, अशी मागणी पुढे आली आहे. १३ ऑगस्टपासून धरणे आंदोलन दरम्यान, निवेदन देऊनही प्रशासनाने दखल घेतली नसल्याचा आरोप करत भावेश भगवान पाटील यांनी १३ ऑगस्ट २०२६ पासून नगरपरिषद कार्यालयासमोर सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शांततापूर्ण धरणे आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषद प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे. त्याचबरोबर १५ ऑगस्ट रोजी मुख्याधिकारी नेमक्या कोणत्या ध्वजस्तंभावर तिरंगा फडकवतात, याकडे भडगावकरांचे लक्ष लागले आहे.

# चाळीसगाव शहरातील घरफोडीचा गुन्हा उघड!



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** चाळीसगाव शहरात झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने तपास करून एका संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे. आरोपीकडून चोरीतील ४० हजार रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली असून, पुढील कारवाईसाठी आरोपी व मुद्देमाल चाळीसगाव शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. घरातून ८० हजारांची रोकड चोरी दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात याबाबत फिर्याद दाखल करण्यात आली होती. दि. ३१ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने घरामागील भिंतीच्या पत्रातून घरात प्रवेश केला. घरातील स्टीलच्या डब्यात ठेवलेली ८० हजार रुपयांची रोकड चोरीला गेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले. या प्रकरणी संशयित नदीम शहा लियाकत शहा आणि त्याच्या साथीदारांवर संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यानुसार चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५, ३३१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गोपनीय माहितीवरून सापळा गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना तपासाबाबत मार्गदर्शन केले.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

# कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याचा मानवतेचा वारसा

## पोलिश निर्वासितांना दिला होता आश्रय



जन सम्राट टाईम्स

**कोल्हापूर | प्रतिनिधी :** दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मानवतेचा आदर्श निर्माण करणाऱ्या कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याच्या कार्याला पुन्हा एकदा उजाळा मिळाला आहे. जर्मनी आणि सोव्हिएत युनियनने पोलंडवर आक्रमण केल्यानंतर हजारो पोलिश नागरिकांना निर्वासित व्हावे लागले होते. अशा संकटाच्या काळात कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याने १९४२ ते १९४८ या कालावधीत सुमारे पाच हजार पोलिश निर्वासितांना वळीवडे येथे आश्रय दिला होता. कोल्हापूरकरांनीही या निर्वासितांना सहकार्य केले. त्यामुळे पोलिश नागरिकांना सुरक्षित वातावरणात सन्मानाने नवजीवन उभारता आले. या ऐतिहासिक घटनेमुळे कोल्हापूर आणि पोलंड यांच्यातील भावनिक व मैत्रीपूर्ण संबंधांची पायाभरणी झाली. पोलिश शिष्टमंडळाची वळीवडेला भेट या ऐतिहासिक वारशाचे स्मरण करण्यासाठी पोलिश शिष्टमंडळाने वळीवडे येथील स्मारकाला भेट दिली. यावेळी प्रस्तावित 'म्युझियम ऑफ ह्युमॅनिटी अँड पीस' प्रकल्पाचीही पाहणी करण्यात आली. वळीवडे येथे पोलिश नागरिकांना मिळालेला आश्रय हा केवळ इतिहासातील एक प्रसंग नसून, संकटाच्या काळात मानवतेला धर्म, देश आणि सीमा यांच्यापलीकडे नेणाऱ्या कोल्हापूरच्या संस्कृतीचे उदाहरण मानले जाते. 'दुसरे घर' मानले कोल्हापूरला पोलंडमध्ये परतल्यानंतरही अनेक पोलिश नागरिकांनी कोल्हापूरला आपले 'दुसरे घर' मानले. त्यामुळे वळीवडेच्या या ऐतिहासिक वारशाला भारत-पोलंड संबंधांमध्ये विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या ऐतिहासिक स्मृती आणि मानवतेचा संदेश पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि पोलंड सरकारच्या संयुक्त विद्यमाने संग्रहालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रस्तावित संग्रहालयाच्या माध्यमातून वळीवडेतील पोलिश निर्वासितांच्या इतिहासाला तसेच भारताने संकटकाळात दाखविलेल्या मानवतेला जागतिक स्तरावर अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# चिमुकल्या 'पत्रकार' मुलींच्या युक्तीला यश!

## खांडपे-कोंदिवडे रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू

जन सम्राट टाईम्स



**कर्जत (रायगड)। प्रतिनिधी:** रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील खांडपे-कोंदिवडे रस्त्याच्या दुरवस्थेकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी चिमुकल्या विद्यार्थिनींनी केलेला अनोखा प्रयत्न अखेर यशस्वी ठरला आहे. रस्त्यावरील मोठमोठे खड्डे आणि त्यात साचणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाची 'ग्राउंड रिपोर्ट' तयार करून या मुलींनी सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रशासनापर्यंत समस्या पोहोचवली. त्यानंतर आता या रस्त्याच्या दुरुस्तीचे प्रत्यक्ष काम सुरू झाले आहे. खांडपे जिल्हा परिषद शाळेतील काही विद्यार्थिनींनी रस्त्याच्या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी चक्क पत्रकाराची भूमिका साकारली. हातात माइक नसल्याने एका छत्रीचा माइक म्हणून वापर करत त्यांनी मोबाईल कॅमेऱ्यासमोर रस्त्याची परिस्थिती मांडली. नेहा घारे हिने रिपोर्टरची भूमिका साकारली, तर मानसी पवार हिने कॅमेरा हाताळला. मोबाईल, छत्री अन् समस्येचा बुलंद आवाज रस्त्यावर पडलेले खड्डे, त्यात साचलेले पावसाचे पाणी आणि त्यामुळे दुचाकीस्वार, शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व इतर प्रवाशांना होणाऱ्या त्रासाचे चित्रण या मुलींनी आपल्या व्हिडिओत केले. वृत्तवाहिनीच्या बातमीची हुबेहूब नक्कल करत त्यांनी तयार केलेला हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला. चिमुकल्या मुलींच्या कल्पकतेसोबतच त्यांनी उपस्थित केलेल्या रस्त्याच्या गंभीर प्रश्नाचीही सर्वत्र चर्चा झाली. त्यामुळे संबंधित प्रशासनाचे या समस्येकडे लक्ष वेधले गेले. प्रशासनाकडून अखेर दुरुस्तीला सुरुवात सोशल मीडियावरील व्हिडिओची दखल घेत संबंधित विभागाकडून खांडपे-कोंदिवडे रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेण्यात आले असून, नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी दुरुस्तीचे काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. चिमुकल्या विद्यार्थिनींनी कोणत्याही मोठ्या व्यासपीठाची किंवा महागड्या साधनांची अपेक्षा न करता एक छत्री, एक मोबाईल आणि आपल्या परिसरातील समस्येचा आवाज याच्या माध्यमातून प्रशासनाला जागे केले. त्यांच्या या अनोख्या पत्रकारितेचे आणि सामाजिक जाणीवेचे स्थानिकांकडून कौतुक होत आहे.

# उमेद अभियानातील कथित भ्रष्टाचाराविरोधात बचत गटाच्या महिलांचे 'बिऱ्हाड' आंदोलन!

## तीन दिवसांपासून जेलरोडवर आंदोलन

जन सम्राट टाईम्स



**धुळे । (प्रतिनिधी):** उमेद अभियानांतर्गत महिला बचत गटांना वितरित करण्यात आलेल्या विविध मशीनच्या दर्जाबाबत आणि खरेदी प्रक्रियेत कथित भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत बचत गटाच्या महिलांनी धुळे शहरातील जेलरोड परिसरात 'बिऱ्हाड' आंदोलन सुरू केले आहे. वितरित करण्यात आलेल्या बंद पडलेल्या मशीन आंदोलनस्थळी आणून महिलांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. गेल्या तीन दिवसांपासून महिला आंदोलनाला बसल्या असूनही प्रशासनातील एकही वरिष्ठ अधिकारी आंदोलनस्थळी भेट देण्यासाठी आला नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. प्रशासनाच्या या भूमिकेबद्दल संताप व्यक्त करत भारती माळी यांनी, "लाडक्या बहिणी केवळ नावालाच आहेत का?" असा सवाल उपस्थित केला. मशीन बंद पडल्याने रोजगाराचा प्रश्न महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या उमेद अभियानांतर्गत धुळे तालुक्यातील विविध महिला बचत गटांना वेगवेगळ्या प्रकारच्या मशीन वितरित करण्यात आल्या. मात्र काही कालावधीनंतर या मशीन बंद पडल्याने महिलांच्या रोजगारावर परिणाम झाला असून, त्यांच्यासमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला आहे. निकृष्ट दर्जाच्या मशीन वितरित करून शासनाच्या निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप करत संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींवर चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी महिलांनी केली आहे. १५ ऑगस्टला सामूहिक आत्मदहनाचा इशारा आंदोलनाची प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी आणि कथित भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी महिलांनी केली आहे. दोन दिवसांत कारवाई न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे. दरम्यान, या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते बापू बागुल, भारती माळी, विमलबाई पाटील, रेखाबाई पाटील, निर्मला पाटील, सरला माळी, संगीता पाटील यांच्यासह महिला बचत गटांच्या सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाल्या आहेत.

# संभाजीनगरमध्ये शहर काँग्रेसचा पडेगाव येथे SIR आढावा!

## ७ हजार नागरिकांचे फॉर्म भरून घेण्यात आल्याचा दावा

जन सम्राट टाईम्स



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी:** शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने पडेगाव परिसरात SIR आढावा व संघटन दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या दौऱ्यात काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी स्थानिक नागरिकांच्या प्रत्यक्ष भेटी घेत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच SIR संदर्भातील विविध बाबींवर नागरिकांशी सविस्तर चर्चा केली. या मोहिमेअंतर्गत यापूर्वी सुमारे ७ हजार नागरिकांचे फॉर्म भरून घेण्यात आल्याचा दावा शहर काँग्रेसकडून करण्यात आला. आजच्या दौऱ्यात आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. या उपक्रमाला पडेगाव परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले. पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती या आढावा व संघटन दौऱ्यात शहर काँग्रेसचे अध्यक्ष सय्यद अक्रम, शहर सचिव सय्यद झाकीर, संजयभाऊ धर्मरक्षक, पश्चिम विधानसभा अध्यक्ष तथा NSUI विद्यार्थी साठे, तसेच सय्यद जावेद, मोईन कुरेशी, आसाराम साठे, मयुर साठे, विशाल बंसलवाल, नईम बेग, जावेद पठाण, उमर शेख, सलमान सय्यद आणि अमीर शेख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

# केरळ आता 'केरळम' नावाने ओळखले जाणार

## लोकसभेत विधेयक मंजूर




जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली| प्रतिनिधी:** केरळ राज्याचे अधिकृत नाव बदलून 'केरळम' करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. 'Kerala (Alteration of Name) Bill, 2026' हे विधेयक मंगळवारी, ११ ऑगस्ट रोजी लोकसभेत विरोधकांच्या घोषणाबाजीदरम्यान आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. केरळचे नाव 'केरळम' करण्याची मागणी राज्याच्या भाषिक आणि सांस्कृतिक अस्मितेशी जोडलेली आहे. केरळ विधानसभेने २४ जून २०२४ रोजी राज्याचे नाव 'केरळ'ऐवजी 'केरळम' करण्याचा ठराव एकमताने मंजूर केला होता. त्यानंतर केंद्र सरकारने या प्रस्तावावर पुढील घटनात्मक प्रक्रिया सुरू केली. मल्याळम भाषेतील नावाला अधिकृत स्वरूप मल्याळम भाषेत केरळला 'केरळम' असे संबोधले जाते. मात्र भारतीय संविधानाच्या पहिल्या अनुसूचीमध्ये राज्याचे नाव 'Kerala' असे नोंदवलेले आहे. त्यामुळे राज्याचे अधिकृत नाव स्थानिक भाषेतील प्रचलित स्वरूपाशी सुसंगत करण्यासाठी हा बदल प्रस्तावित करण्यात आला. २०२६ मध्ये केंद्र सरकारची प्रक्रिया केंद्राच्या मंत्रिमंडळाने फेब्रुवारी २०२६ मध्ये 'Kerala' हे नाव बदलून 'Keralam' करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली होती. त्यानंतर घटनात्मक तरतुदीनुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून हे विधेयक संसदेत मांडण्यात आले. लोकसभेतील मंजुरीनंतर पुढील प्रक्रिया लोकसभेने विधेयक मंजूर केल्यानंतर आता संसदेतील पुढील घटनात्मक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर 'केरळ'चे अधिकृत नाव 'केरळम' होण्याचा मार्ग सुकर झाला आहे. या निर्णयाकडे राज्याच्या भाषिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ओळखीला अधिकृत स्वरूप देणारे महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

# कंकराळा-पिंपरी फाटा रस्त्याची दुरवस्था; खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका

## रुग्णवाहिका, शालेय बससह वाहनचालक त्रस्त; लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे नागरिक संतप्त

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव | प्रतिनिधी :** तालुक्यातील कंकराळा ते पिंपरी फाटा या महत्त्वाच्या रस्त्याची गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. रस्त्यावरील डांबर उखडून जागोजागी मोठमोठे खड्डे पडले असून, पावसामुळे अनेक ठिकाणी चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे वाहनचालक, शेतकरी, विद्यार्थी आणि रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मागील दोन ते तीन वर्षांपासून या रस्त्याकडे लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रुग्णवाहिका ते शालेय बस सर्वांनाच त्रास कंकराळा, पिंपरी, माळेगाव-पिप्री परिसरातील शेकडो नागरिक दररोज या रस्त्यावरून ये-जा करतात. रस्त्यावर पडलेल्या खड्डयांमुळे दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होत असून, खड्डयांमध्ये पाणी साचल्याने त्यांची खोली लक्षात येत नाही. रुग्णवाहिका, शालेय बस तसेच अन्य वाहनांना या मार्गावरून प्रवास करताना मोठ्या अडचणी येत आहेत. रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचविण्यात अडथळे निर्माण होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. 'मतदानाला येतात, विकासाला पाठ'



"निवडणुकीच्या काळात आमदार, खासदार आणि जिल्हा परिषद सदस्य मत मागण्यासाठी गावागावात येतात. मोठमोठी आश्वासने दिली जातात; मात्र निवडून गेल्यानंतर या रस्त्याकडे कोणीही लक्ष देत नाही," अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली. तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी या मार्गावरून शेतकरी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित विभागाने रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून खड्डे बुजविण्याबरोबरच दर्जेदार डांबरीकरण करावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. रस्त्याची तातडीने दुरुस्ती न झाल्यास ग्रामस्थांच्या वतीने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात येत आहे. त्यामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या गंभीर समस्येकडे आता तरी गांभीर्याने लक्ष देणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

तालुक्यातील कंकराळा ते पिंपरी फाटा या महत्त्वाच्या रस्त्याची गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. रस्त्यावरील डांबर उखडून जागोजागी मोठमोठे खड्डे पडले असून, पावसामुळे अनेक ठिकाणी चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे वाहनचालक, शेतकरी, विद्यार्थी आणि रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मागील दोन ते तीन वर्षांपासून या रस्त्याकडे लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रुग्णवाहिका ते शालेय बस सर्वांनाच त्रास कंकराळा, पिंपरी, माळेगाव-पिप्री परिसरातील शेकडो नागरिक दररोज या रस्त्यावरून ये-जा करतात. रस्त्यावर पडलेल्या खड्डयांमुळे दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होत असून, खड्डयांमध्ये पाणी साचल्याने त्यांची खोली लक्षात येत नाही. रुग्णवाहिका, शालेय बस तसेच अन्य वाहनांना या मार्गावरून प्रवास करताना मोठ्या अडचणी येत आहेत. रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचविण्यात अडथळे निर्माण होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.

# TET उत्तीर्ण विद्यार्थ्यांची नावे पवित्र पोर्टलवर समाविष्ट करा!

## २०२४-२५ नंतर TET उत्तीर्ण D.Ed.-B.Ed. उमेदवारांना शिक्षक भरतीत संधी देण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**धुळे |प्रतिनिधी :** राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेत पात्र असूनही पवित्र पोर्टलवर नाव समाविष्ट नसल्यामुळे नोकरीच्या संधीपासून वंचित राहणाऱ्या २०२४-२५ नंतर शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण D.Ed.-B.Ed. उमेदवारांना दिलासा देण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी शिवसेनेच्या राज्य उपनेत्या तथा महाराष्ट्र टीचर्स असोसिएशनच्या राज्याध्यक्ष शुभांगी पाटील यांनी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. राज्यात शिक्षक भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने पवित्र पोर्टल प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीमध्ये सन २०२४ पर्यंत TET उत्तीर्ण झालेल्या D.Ed. व B.Ed. पात्रताधारक उमेदवारांची नावे समाविष्ट करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर TET परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची नावे पवित्र पोर्टलमध्ये समाविष्ट करण्यात आलेली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. टॅब बंद असल्याने उमेदवार अडचणीत २०२४-२५ नंतर TET उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पवित्र पोर्टलवर समाविष्ट करण्यासाठी उपलब्ध असलेला टॅब बंद असल्याने पात्र उमेदवारांना शिक्षक भरती प्रक्रियेत सहभागी होता येत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सध्या शासनाच्या विविध विभागांसह खासगी संस्थांच्या शिक्षक भरतीच्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. मात्र पवित्र पोर्टलवर नावे नसल्यामुळे TET उत्तीर्ण असतानाही संबंधित उमेदवारांना या भरती प्रक्रियेपासून वंचित राहावे लागत असल्याची व्यथा विद्यार्थ्यांनी शुभांगी पाटील यांच्याकडे मांडली. शिक्षणमंत्र्यांकडून प्रधान सचिवांना निर्देश विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन शुभांगी पाटील यांनी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे तातडीने निवेदन सादर केले. २०२४-२५ नंतर TET उत्तीर्ण झालेल्या D.Ed. व



B.Ed. पात्रताधारक विद्यार्थ्यांची नावे पवित्र पोर्टलमध्ये तात्काळ समाविष्ट करून त्यांना शिक्षक भरती प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. या मागणीची दखल घेत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे शुभांगी पाटील यांनी सांगितले. या निर्णयामुळे पवित्र पोर्टलवर नाव समाविष्ट होण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या TET उत्तीर्ण उमेदवारांना शिक्षक भरतीत सहभागी होण्याची संधी मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेत पात्र असूनही पवित्र पोर्टलवर नाव समाविष्ट नसल्यामुळे नोकरीच्या संधीपासून वंचित राहणाऱ्या २०२४-२५ नंतर शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण D.Ed.-B.Ed. उमेदवारांना दिलासा देण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी शिवसेनेच्या राज्य उपनेत्या तथा महाराष्ट्र टीचर्स असोसिएशनच्या राज्याध्यक्ष शुभांगी पाटील यांनी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. राज्यात शिक्षक भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी शासनाने पवित्र पोर्टल प्रणाली सुरू केली आहे. या प्रणालीमध्ये सन २०२४ पर्यंत TET उत्तीर्ण झालेल्या D.Ed. व B.Ed. पात्रताधारक उमेदवारांची नावे समाविष्ट करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर TET परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची नावे पवित्र पोर्टलमध्ये समाविष्ट करण्यात आलेली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. उमेदवार अडचणीत २०२४-२५ नंतर TET उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पवित्र पोर्टलवर समाविष्ट करण्यासाठी उपलब्ध असलेला टॅब बंद असल्याने पात्र उमेदवारांना शिक्षक भरती प्रक्रियेत सहभागी होता येत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सध्या शासनाच्या विविध विभागांसह खासगी संस्थांच्या शिक्षक भरतीच्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. मात्र पवित्र पोर्टलवर नावे नसल्यामुळे TET उत्तीर्ण असतानाही संबंधित उमेदवारांना या भरती प्रक्रियेपासून वंचित राहावे लागत असल्याची व्यथा विद्यार्थ्यांनी शुभांगी पाटील यांच्याकडे मांडली. शिक्षणमंत्र्यांकडून प्रधान सचिवांना निर्देश विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन शुभांगी पाटील यांनी शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे तातडीने निवेदन सादर केले. २०२४-२५ नंतर TET उत्तीर्ण झालेल्या D.Ed. व B.Ed. पात्रताधारक विद्यार्थ्यांची नावे पवित्र पोर्टलमध्ये तात्काळ समाविष्ट करून त्यांना शिक्षक भरती प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. या मागणीची दखल घेत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे शुभांगी पाटील यांनी सांगितले.

# आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात रावेरमध्ये भव्य मोर्चा!

## हजारो भीमसैनिकांचा सहभाग



जन सम्राट टाईम्स

**रावेर। प्रतिनिधी:** आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात रावेर येथे समाज बांधवांच्या वतीने भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चात हजारो भीमसैनिक सहभागी झाले होते. आरक्षण उपवर्गीकरणाचा निर्णय मागे घेण्याची मागणी यावेळी करण्यात आली. मोर्चाला ऑल इंडिया पँथर सेनेच्या जळगाव जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून जाहीर पाठिंबा दिला.

मोर्चादरम्यान सहभागी कार्यकर्त्यांनी आपल्या मागण्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. पँथर सेनेच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती मोर्चाला ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष लखन पानपाटील, उपजिल्हाध्यक्ष अजय शेलार, जिल्हा कार्याध्यक्ष अक्षय वाघ, जिल्हा महासचिव आदित्य गजरे, रावेर तालुकाध्यक्ष विनोद मोरे, युवा तालुकाध्यक्ष जितू इंगळे, उपाध्यक्ष श्रावण भालेराव, संघटक गणेश गाढे, कार्याध्यक्ष सागर ठाकरे, मुक्ताईनगर तालुकाध्यक्ष अतुल अटकाळे आणि सोशल मीडिया अध्यक्ष समीर गाढे यांच्यासह जळगाव जिल्ह्यातील पँथर सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरक्षण उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर समाजामध्ये जनजागृती करून आपल्या मागण्यांसाठी पुढील काळातही आंदोलनाची भूमिका कायम ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# प्रसारित ऑडिओ क्लिपमुळे मनपाच्या डॉक्टर अडचणीत

## कारवाईच्या मागणीसाठी युवासेना आक्रमक



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** प्रसारित झालेल्या कथित ऑडिओ क्लिपमुळे धुळे महानगरपालिकेतील महिला डॉक्टर वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. या ऑडिओ क्लिपमध्ये दोन समाजांत तेढ निर्माण होईल, अशा स्वरूपाचे संभाषण असल्याचा आरोप युवासेनेने केला आहे. संबंधित डॉक्टरांवर तातडीने कारवाई करून त्यांना निलंबित करावे तसेच गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी युवासेनेने मनपा प्रशासनाकडे निवेदन दिले आहे. धुळे महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या एका रुग्णालयातील महिला डॉक्टरांनी कर्मचाऱ्याशी भ्रमणध्वनीवरून केलेल्या कथित संभाषणाची ऑडिओ क्लिप प्रसारित झाल्यानंतर हा प्रकार समोर आल्याचे युवासेनेचे म्हणणे आहे. या संभाषणामुळे दोन समाजांत तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्याचा आरोप करत युवासेनेने संबंधित प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे. युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित ऑडिओ क्लिप मनपा आयुक्तांकडे सादर करून डॉ. सीमा मुजावर यांचे तात्काळ निलंबन करावे आणि चौकशी करून दोष आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच दोन दिवसांत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही प्रशासनाला देण्यात आला आहे. ऑडिओ क्लिपची सत्यता तपासण्याची मागणी दरम्यान, प्रसारित ऑडिओ क्लिपची सत्यता, संभाषणाचा संदर्भ आणि त्यामागील वस्तुस्थिती यांची अधिकृत चौकशी होणे आवश्यक असल्याचेही या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर स्पष्ट होत आहे. प्रशासनाच्या चौकशीनंतरच आरोपांमागील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. युवासेनेचे पदाधिकारी आक्रमक हे निवेदन युवासेनेचे उत्तर महाराष्ट्र सचिव अविष्कार भुसे आणि शिवसेना जिल्हाप्रमुख मनोज मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना जिल्हाप्रमुख योगेश मराठे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी शहरप्रमुख अमित खंडेलवाल, अनिल ठाकूर, चेतन धामेच्या, नितीन धनगर, सुमित चौधरी, तुषार सातपुते, सागर पाटील, राहुल ठाकूर, प्रीतम धात्रक, प्रवीण मराठे, शुभम पाटील, दिगंबर कासार आदी पदाधिकारी उपस्थित होते. युवासेनेच्या या मागणीवर मनपा प्रशासन काय भूमिका घेते आणि कथित ऑडिओ क्लिपच्या चौकशीतून नेमके काय समोर येते,

# नाशिक कुंभमेळ्याच्या नावावर ५०० कोटींचा बनावट टेंडर घोटाळा?

## पाणी, बॅरिकेड्स, हाऊसकीपिंगच्या नावाने बनावट वर्क ऑर्डर

जन सम्राट टाईम्स



**नाशिक| प्रतिनिधी:** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामांच्या नावावर बनावट ऑफलाइन निविदा आणि वर्क ऑर्डर तयार करून तब्बल ५०० कोटी रुपयांची फसवणूक करण्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याचा गौप्यस्फोट कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी केला आहे. या कथित प्रकरणात जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथील दोन आणि धुळे जिल्ह्यातील एका व्यक्तीचा सहभाग असल्याची माहितीही त्यांनी दिली आहे. कुंभमेळ्यासाठी शासनाने स्वतंत्र प्राधिकरण स्थापन केले असून, त्यामध्ये पाच आयएएस अधिकारी कार्यरत आहेत. कुंभमेळ्याशी संबंधित निविदा प्रक्रिया अधिकृतपणे ऑनलाइन पद्धतीने होत असताना काही व्यक्तींनी प्रशासनाच्या नावाचा गैरवापर करून बनावट ऑफलाइन वर्क ऑर्डर तयार केल्याचा आरोप आहे. १०० ते १५० कोटींच्या वर्क ऑर्डर्सचा संशय या कथित रॅकेटमधून तीन ते चार कंत्राटदारांना पोलिसांना दोन वेळचे जेवण पुरविणे, विविध साहित्य उपलब्ध करून देणे आदी कामांसाठी १०० ते १५० कोटी रुपयांच्या वर्क ऑर्डर्स देण्यात आल्याचे समोर आले आहे.

संबंधित कंत्राटदारांना या ऑर्डर्स संशयास्पद वाटल्यानंतर त्यांनी स्वतःहून प्रशासनाकडे तक्रार केल्याचे सांगण्यात आले.या बनावट वर्क ऑर्डर्स मिळवून देण्याच्या बदल्यात संबंधितांकडून रोख रक्कम तसेच धनादेशाच्या माध्यमातून पैसे घेतल्याचा आरोप आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अधिकाऱ्यांच्या नावाचा गैरवापर? या प्रकाराची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह आणि विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्यापर्यंत पोहोचविण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता, अशा कोणत्याही कामाची अधिकृत वर्क ऑर्डर किंवा कमिशनची मागणी करण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट झाल्याचे महाजन यांनी सांगितले. त्यामुळे शासनाच्या अधिकृत यंत्रणेचा आभास निर्माण करून कंत्राटदारांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. या कामांच्या नावाने बनावट ऑर्डर्स पोलिसांना ७० दिवस दोन वेळचे जेवण पुरविणे नाशिक शहराला पाणीपुरवठा करणे पोलिसांना बॅरिकेड्स पुरविणे पोलिसांना हाऊसकीपिंग सेवा देणे कुंभमेळ्याच्या नावावर एवढ्या मोठ्या रकमेच्या बनावट वर्क ऑर्डर्स तयार झाल्याची बाब समोर आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. या प्रकरणामागे नेमके कोण आहे, बनावट कागदपत्रे कुठे आणि कशी तयार करण्यात आली, तसेच आर्थिक व्यवहार कोणामार्फत झाले.

# विद्यार्थ्यांनी मेहनत, जिद्द आणि ज्ञानाच्या बळावर भविष्य घडवावे – प्रा. डॉ. जतीन मेढे

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ | प्रतिनिधी:** शिक्षण हे मानवी जीवनात परिवर्तन घडवून आणणारे प्रभावी साधन आहे. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्रचंड मेहनत, जिद्द आणि ज्ञानाच्या बळावर स्वतःचे तसेच देशाचे उज्ज्वल भविष्य घडवावे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. जतीन मेढे यांनी केले. प्रागतिक विचार मंचच्या वतीने आयोजित 'गौरव यशवंतांचा' या कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. भुसावळ तालुक्यातील दहावी व बारावीच्या परीक्षेत प्रत्येक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचा गौरव समारंभ क्रांतीदिनी भुसावळ येथील नाहाटा महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास वरणगावचे लोकनियुक्त नगराध्यक्ष सुनील काळे, पोलीस निरीक्षक प्रमोद कठोरे, प्रा. डॉ. सुनील नेवे, डॉ. राजेश मानवतकर, प्रागतिक विचार मंचचे अध्यक्ष जे. पी. सपकाळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. दीडशे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव भुसावळ शहर व तालुक्यातील सुमारे १५० गुणवंत विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. मेढे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय शैक्षणिक प्रवासाचा दाखला दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले. अनेक अपमान आणि अडचणींना सामोरे जात त्यांनी ज्ञान संपादन केले आणि आपल्या विद्वत्तेच्या बळावर जगभरात आदराचे स्थान निर्माण केले. संविधानाच्या माध्यमातून त्यांनी देशातील नागरिकांना स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुत्वाची मूल्ये दिली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनकार्याचा आदर्श समोर ठेवून शैक्षणिक प्रगती करावी, असे आवाहन त्यांनी केले. "राजे शिवराय, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना समोर ठेवून कितीही कठीण परिस्थिती आली तरी शिक्षण सोडू नका. शिक्षणच जीवनात सर्वांगीण विकासाची दिशा देणारे प्रभावी माध्यम आहे," असेही प्रा. डॉ. मेढे यांनी सांगितले. स्पर्धा परीक्षेच्या तयारीचे आवाहन नगराध्यक्ष सुनील काळे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश आत्मसात करून परिस्थितीशी लढण्याचे आवाहन केले. पोलीस निरीक्षक प्रमोद कठोरे यांनी कठोर मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाशिवाय यश मिळत नसल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने स्पर्धा परीक्षांची तयारी करून प्रशासनातील अधिकारी होण्याचे ध्येय ठेवावे, असे त्यांनी सांगितले. प्रा. डॉ. सुनील नेवे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परदेशातील शैक्षणिक प्रवासाच्या आठवणी सांगत विद्यार्थ्यांनी त्यांचे जीवनचरित्र वाचून प्रेरणा घ्यावी

# वृक्षलागवड अभियानांतर्गत लोन प्र. ऊ. येथे वृक्षारोपण उत्साहात

## 'एक घर, एक झाड' उपक्रमातून ५०० वृक्ष लागवडीचा संकल्प

जन सम्राट टाईम्स

**भडगाव। प्रतिनिधी:** गणेश रावळ: सन २०२६-२७ वृक्षलागवड अभियानांतर्गत मौजे लोन प्र. ऊ., ता. भडगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पंचायत समिती भडगावचे गटविकास अधिकारी सुयोग अंजने यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत विस्तार अधिकारी खैरनार, कृषी विस्ताराधिकारी देशमुख, सिंचन विभागाचे जितेंद्र देशमुख यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या प्रांगणात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांचाही आढावा घेण्यात आला. कार्यक्रमास सरपंच ॲड. बी. आर. पाटील, रोजगार सेवक गोरख पवार, माजी सरपंच नाना पवार, ग्रामसेवक अनिकेत पाटील, सुरेश पाटील तसेच प्राथमिक शाळेतील शिक्षिका उपस्थित होत्या. 'एक घर,



एक झाड' उपक्रमातून ५०० वृक्ष यावेळी सरपंच ॲड. बी. आर. पाटील यांनी घरकुल लाभार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. येत्या १५ ऑगस्ट रोजी 'एक घर, एक झाड' या संकल्पनेतून सुमारे ५०० वृक्षांची लागवड करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. लागवड केलेली झाडे केवळ लावून न ठेवता त्यांचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवश्यक प्रयत्न केले जातील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. "वृक्षलागवड ही काळाची गरज असून, प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी," असा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांचाही आढावा घेण्यात आला. कार्यक्रमास सरपंच ॲड. बी. आर. पाटील, रोजगार सेवक गोरख पवार, माजी सरपंच नाना पवार, ग्रामसेवक अनिकेत पाटील, सुरेश पाटील तसेच प्राथमिक शाळेतील शिक्षिका उपस्थित होत्या. 'एक घर, एक झाड' उपक्रमातून ५०० वृक्ष यावेळी सरपंच ॲड. बी. आर. पाटील यांनी घरकुल लाभार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

# माधुरी हत्तीणीच्या 'घरवापसी'च्या आशा पल्लवित

## पायाभूत सुविधा, पाणी, वैद्यकीय व्यवस्था व सुरक्षेचा घेतला आढावा; उच्चस्तरीय समितीकडे अहवाल

जन सम्राट टाईम्स



**कोल्हापूर | प्रतिनिधी:** शिरोळ तालुक्यातील ऐतिहासिक नांदणी मठाची लाडकी महादेवी ऊर्फ माधुरी हत्तीण पुन्हा मठात परतणार का, याबाबतच्या आशा आता पल्लवित झाल्या आहेत. माधुरी हत्तीणीच्या संभाव्य पुनर्वसनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी वनतारा व प्रशासनाच्या संयुक्त पथकाने नांदणी मठाला भेट देऊन पाहणी पूर्ण केली आहे. या पाहणीचा सविस्तर अहवाल आगामी २० दिवसांत उच्चस्तरीय समितीकडे (HPC) सादर करण्यात येणार असल्याची माहिती आहे. हत्तीणीसाठी उपलब्ध सुविधांची तपासणी उच्चस्तरीय समितीच्या निर्देशानुसार संयुक्त पथकाने नांदणी मठ परिसराची तांत्रिक पाहणी केली. यावेळी माधुरी हत्तीणीसाठी उपलब्ध असलेली निवासाची जागा, पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, फिरण्यासाठी उपलब्ध क्षेत्र तसेच सुरक्षेच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. हत्तीणीच्या पुनर्वसनासाठी आवश्यक निकषांची पूर्तता होते का, तसेच मठ परिसरात हत्तीणीसाठी सुरक्षित आणि योग्य वातावरण उपलब्ध आहे का, याची माहिती पाहणीदरम्यान घेण्यात आली.

माधुरीला पुन्हा नांदणीत आणण्यासाठी हालचाली काही महिन्यांपूर्वी कायदेशीर प्रक्रिया आणि न्यायालयीन आदेशानुसार नांदणी मठातील माधुरी हत्तीणीला गुजरातमधील जामनगर येथील वनतारा प्रकल्पात हलविण्यात आले होते. माधुरी नांदणीतून गेल्यानंतर वारकरी संप्रदाय, भाविक आणि ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली होती. मठाची परंपरा आणि ग्रामस्थांच्या भावना लक्षात घेऊन माधुरीला पुन्हा नांदणीत आणण्यासाठी कायदेशीर पातळीवर प्रयत्न सुरू झाले. त्याच पार्श्वभूमीवर संयुक्त पथकाची नांदणी मठातील पाहणी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. अहवालानंतर निर्णयाची शक्यता संयुक्त पथकाचा अहवाल आगामी २० दिवसांत उच्चस्तरीय समितीकडे सादर होणार आहे. मठ परिसरात माधुरी हत्तीणीच्या पुनर्वसनासाठी आवश्यक आणि सुरक्षित सुविधा उपलब्ध असल्याचे अहवालातून स्पष्ट झाल्यास तिच्या 'घरवापसी'चा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. या पाहणीच्या वृत्तामुळे नांदणीसह संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यात माधुरीच्या पुनरागमनाबाबत उत्सुकता निर्माण झाली असून, भाविक आणि ग्रामस्थ तिच्या घरवापसीच्या निर्णयाकडे लक्ष ठेवून आहेत. शिरोळ तालुक्यातील ऐतिहासिक नांदणी मठाची लाडकी महादेवी ऊर्फ माधुरी हत्तीण पुन्हा मठात परतणार का, याबाबतच्या आशा आता पल्लवित झाल्या आहेत. माधुरी हत्तीणीच्या संभाव्य पुनर्वसनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी वनतारा व प्रशासनाच्या संयुक्त पथकाने नांदणी मठाला भेट देऊन पाहणी पूर्ण केली आहे. या पाहणीचा सविस्तर अहवाल आगामी २० दिवसांत उच्चस्तरीय समितीकडे (HPC) सादर करण्यात येणार.

# येवती येथे संत सावता महाराज पुण्यतिथी उत्साहात



जन सम्राट टाईम्स

**बोदवड। प्रतिनिधी:** येवती, ता. बोदवड येथे ग्रामस्थांच्या वतीने संत सावता महाराज यांची पुण्यतिथी उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त संत सावता महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी आमदार चंद्रकांत दादा पाटील आणि विधानसभा क्षेत्र प्रमुख हितेश दादा पाटील यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी संत सावता महाराज यांच्या जीवनकार्याचे स्मरण केले. संत सावता महाराज यांनी भक्ती, कष्ट, समता आणि समाजसेवेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन समाजाने एकोपा आणि बंधुभाव जपावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामस्थ, माळी समाज बांधव, महिला तसेच युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांसह संत सावता महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात पार पडली.